


विदर्भ प्रजासत्ताक

E-Mail : prajasattaknews24@gmail.com | RNI No. - MAHMAR 2023/84526 | Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ४ थे ❑ अंक - २५७ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शनिवार दि. २१ नोव्हेंबर २०२६ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -४

कार्तिकी एकादशीनिमित्त उपमुख्यमंत्री शिंदेंनी सपत्नीक केली विठ्ठल-रुक्मिणीची शासकीय महापूजा





नांदेडच्या शेतकरी दाम्पत्याला पूजेचा मान, शिंदेंनी बळीराजासाठी घातले साकडे

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२१पंढरपूर

कार्तिकी एकादशीच्या पावन पर्वावर आज पहाटे अडीच वाजता उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सपत्नीक श्री विठ्ठल-रुक्मिणीची शासकीय महापूजा केली. या महापूजेत वारकरी प्रतिनिधी म्हणून सहभागी होण्याचा बहुमान नांदेड जिल्ह्यातील शेतकरी दाम्पत्याला मिळाला. राज्यातील दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर, 'बळीराजावरील संकट आणि दुष्काळाचे सावट दूर करून त्याला ताकद दे,' असे साकडे उपमुख्यमंत्र्यांनी यावेळी विठुरायाचरणी घातले.

महापूजेनंतर भावना व्यक्त करताना एकनाथ शिंदे म्हणाले की, मुख्यमंत्री असतानाही मी एक वारकरी म्हणूनच इथे आलो होतो आणि आज उपमुख्यमंत्री असतानाही वारकरी म्हणूनच पांडुरंगाच्या दर्शनाला आलो आहे. यावेळी खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्यासह त्यांच्या पत्नी आणि मुलगा देखील उपस्थित होते.

नांदेडच्या शेतकरी दाम्पत्याची मनोकामना पूर्ण

यंदाच्या शासकीय महापूजेचा मान नांदेड जिल्ह्यातील हदगाव तालुक्यातील उंचेगाव येथील शेतकरी सुधाकर दशरथ शिंदे आणि त्यांच्या पत्नी प्रणिता सुधाकर शिंदे यांना मिळाला. महापूजेनंतर सुधाकर शिंदे यांनी अत्यंत भावुक प्रतिक्रिया दिली. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासोबत वारकरी प्रतिनिधी म्हणून पांडुरंगाची पूजा करण्याची संधी मिळावी, अशी माझी मनापासून इच्छा होती. आज स्वतः पांडुरंगाने माझी ती इच्छा पूर्ण केली, असे ते म्हणाले.

शासकीय महापूजेनंतर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी 'पंढरपूर ते घुमान' (पंजाब) या सायकलवारीला हिरवा झेंडा दाखवला. पांडुरंगाच्या आशीर्वादाची प्रेरणा घेऊन अनेक तरुण आणि ज्येष्ठ सायकलपटू पंजाबमधील घुमानकडे रवाना झाले आहेत. या सर्व सायकलपटूंना उपमुख्यमंत्र्यांनी प्रवासासाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.कार्तिकी एकादशीनिमित्त पंढरपूर नगरी हरिनामाच्या गजराने दुमदुमून गेली असली, तरी गतवर्षीच्या तुलनेत यंदा भाविकांची संख्या काहीशी कमी आहे. गेल्या वर्षी ४ लाखांहून अधिक भाविक आणि १४३ दिंड्या पंढरीत दाखल झाल्या होत्या. मात्र, यंदा मराठवाडा आणि विदर्भातून येणाऱ्या भाविकांची संख्या कमी राहिल्याचे चित्र आहे. त्यामुळे यंदा भाविकांच्या संख्येत सुमारे १ लाखाने घट होऊन ३ लाखांवर भाविक आणि १२० दिंड्या पंढरीत दाखल झाल्याचा अंदाज वर्तवण्यात येत आहे.

तहान भागवण्यासाठी २०५१ पर्यंतचे जलनियोजन करा

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निर्देश

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२१मुंबई

मुंबई आणि पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण क्षेत्रांतील पाणी नियोजन व व्यवस्थापनाचा आढावा वर्षा निवासस्थानी घेण्यात आला. मुंबई महानगर प्रदेशासाठी २०५१ पर्यंत आणि पुणे महानगर प्रदेशासाठी २०४७ पर्यंतची लोकसंख्या, नागरीकरण तसेच उद्योगांची वाढती गरज लक्षात घेऊन एकात्मिक, कालबद्ध आणि आर्थिकदृष्ट्या व्यवहार्य दीर्घकालीन जलनियोजन तयार करावे. नवीन प्रकल्पांबरोबरच



प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याचा पुनर्वापर, पाणीगळती नियंत्रण, पर्जन्यजल संचयन आणि पर्यायी जलस्रोतांवर भर द्यावा, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

वाढती लोकसंख्या, वेगाने होणारे नागरीकरण, उद्योग आणि डेटा सेंटरच्या वाढत्या गरजा विचारात घेऊन उपलब्ध जलस्रोतांचा कार्यक्षम वापर, पर्यायी जल स्रोतांचा शोध घेणे तसेच प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याचा पुनर्वापर वाढविण्यात यावा. तसेच सध्या राज्यात विशेषतः मुंबई व पुणे महानगरपरिसरात सुरू असलेले जलप्रकल्प वेळेत पूर्ण करणे, प्रस्तावित प्रकल्पांसाठी वन व पर्यावरणविषयक मान्यता, भूसंपादन आणि पुनर्वसनाची कार्यवाही समांतरपणे करणे तसेच उपलब्ध पाण्याचा कार्यक्षम वापर करणे आवश्यक असल्याचे मुख्यमंत्र्यांनी यावेळी स्पष्ट केले.

'समृद्धी'च्या पुलाखाली गांजा तस्करी, महिलेसह ७ आरोपी ताब्यात



विदर्भ प्रजासत्ताक
दि.२१बुलढाणा- मेहकर पोलिसांनी गांजाची अवैध विक्री करणाऱ्या टोळीवर धडक कारवाई करत सात आरोपींना ताब्यात घेतले आहे. मेहकर-जानेफळ रोडवरील समृद्धी महामार्गाच्या पुलाखालील गोटाळा शिवारात ही कारवाई करण्यात आली.पोलिसांनी आरोपींकडून १९ किलो ६६० ग्रॅम गांजा, एक इर्टिका कार, मोबाईल व इतर साहित्य असा एकूण १९ लाख १३ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.

पांढऱ्या रंगाच्या मारुती सुझुकी इर्टिका कारमधून काही इसम गांजाची विक्री करण्याच्या उद्देशाने मेहकर, जानेफळ व डोणगाव परिसरात येणार असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे पोलीस अधीक्षक निलेश तांबे, अपर पोलीस अधीक्षक अमोल गायकवाड व उपविभागीय पोलीस अधिकारी संतोष खाडे यांच्या मार्गदर्शनाखाली मेहकर पोलिसांनी सापळा रचला.मेहकर-जानेफळ रोडवरील समृद्धी महामार्गाच्या पुलाखाली गोटाळा गावाजवळ पोलिसांनी इर्टिका कार अडवून तपासणी केली असता कारच्या मागील डिक्कीमध्ये दोन सुटकेसमध्ये १९ किलो ६६० ग्रॅम गांजा आढळून आला. पोलिसांनी गांजा, इर्टिका कार (क्रमांक एम एच २८ सीसी ९८८४), मोबाईल व इतर साहित्य असा एकूण १९ लाख १३ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

या कारवाईत आरोपी किरण विष्णू चांदणे (३०, रा. मुंदेफळ, ता. मेहकर, जि. बुलढाणा) योगेश वसंत पानभरे (२६, रा. पेंडगाव, ता. मंगरूळपीर, जि. वाशिम) विवेक रमेश दाभाडे (२०, रा. इंदिरानगर, जानेफळ, ता. मेहकर) अभिषेक नारायण शेख (२१, रा. इंदिरानगर, जानेफळ, ता. मेहकर, जिल्हा बुलढाणा) संदीप आत्माराम दातार (३६, रा. अहिल्यानगर, जानेफळ, ता. मेहकर,) सचिन भगवान फुके (२०, रा. अहिल्यानगर, जानेफळ, ता. मेहकर) यासह कोथरूड, पुणे येथील एका महिलेस देखील ताब्यात घेतले आहे. या प्रकरणी महिला पोलीस उपनिरीक्षक कांचन जारवाल यांनी तक्रार दिली. फिर्यादीवरून मेहकर पोलीस ठाण्यात एनडीपीएस कायदा १९८५ मधील कलम ८(क), २०(ब) (क), २२ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सुरू आहे.

अमरावतीच्या १७ वर्षीय तिरंदाज कुमकुम मोहोडचे ऐतिहासिक यश

'TIME100 Next India 2026' यादीत समावेश आणि ऑलिम्पिक कोटा निश्चित

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२१ अमरावती:

विदर्भातील अमरावती शहराची १७ वर्षीय युवा तिरंदाज कुमकुम अनिल मोहोड हिने जागतिक क्रीडा क्षेत्रात ऐतिहासिक कामगिरी करत देशाचे आणि महाराष्ट्राचे नाव उंचावले आहे. प्रतिष्ठित आंतरराष्ट्रीय नियतकालिक 'टाईम' (TIME) ने नुकत्याच प्रसिद्ध केलेल्या 'TIME100 Next India 2026' या विशेष यादीत कुमकुमने स्थान पटकावले आहे. यासोबतच आशियाई क्रीडा स्पर्धेतील सुवर्ण कामगिरीच्या जोरावर तिने २०२८ मध्ये अमेरिकेतील लॉस एंजेलिस येथे होणाऱ्या ऑलिम्पिक स्पर्धेसाठी भारताचा पात्रता कोटा निश्चित केला आहे. एकाच वेळी जागतिक स्तरावर प्रभावशाली युवा व्यक्तिमत्त्व म्हणून मिळालेली ओळख आणि ऑलिम्पिक पात्रतेचा मान, यामुळे क्रीडा वर्तुळात तिचे सर्वत्र कौतुक होत आहे.जगभरातील विविध क्षेत्रांत भविष्यात मोठे बदल घडवून आणण्याची क्षमता असलेल्या उदयोन्मुख आणि प्रभावशाली व्यक्तिमत्त्वांची निवड 'द्धखचए१०० छर्शी' या यादीत केली जाते. यंदाच्या भारतातील विशेष यादीत क्रीडा क्षेत्रातून कुमकुम अनिल मोहोड हिची निवड झाली आहे. वयाच्या अवघ्या सतराव्या वर्षी तिने आंतरराष्ट्रीय स्तरावर



दाखवलेली परिपक्वता, सातत्यपूर्ण खेळ आणि दडपणाखाली सर्वोत्तम कामगिरी करण्याची तिची जिद्द याची दखल जागतिक पातळीवर घेण्यात आली आहे.ऑक्टोबर २०२६ मध्ये जपानमधील ऐची-नागोया येथे पार पडलेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेत कुमकुमने भारतीय तिरंदाजीचा नवा इतिहास रचला. या स्पर्धेत महिलांच्या रिकर्व्ह वैयक्तिक प्रकारात सुवर्णपदक पटकावणारी ती पहिलीच भारतीय महिला तिरंदाज ठरली आहे. या स्पर्धेत तिने एकूण दोन सुवर्ण आणि एक रौप्य पदक अशी दिमाखदार कामगिरी करत पदकांची लयलूट केली. आशियाई क्रीडा स्पर्धेतील या ऐतिहासिक सुवर्णपदकामुळे तिला थेट २०२८ च्या लॉस एंजेलिस ऑलिम्पिक स्पर्धेसाठी भारताचा कोटा मिळवून देण्यात यश आले आहे .अमरावतीसारख्या शहरातून अत्यंत जिद्दीने आणि कठोर मेहनतीच्या जोरावर कुमकुमने हा जागतिक प्रवास पूर्ण केला आहे. तिचे वडील अनिल मोहोड आणि प्रशिक्षकांचे मार्गदर्शन तिच्या या यशात मोलाचे ठरले आहे. पहाटेपासून सुरू होणारा सराव, अचूक लक्ष्यवेध आणि मानसिक एकाग्रतेवर तिने दिलेला भर यामुळे तिला हे यश मिळाले आहे.कुमकुमच्या या दुहेरी यशामुळे अमरावतीसह संपूर्ण महाराष्ट्रात आनंदाचे वातावरण आहे. क्रीडा संघटना, प्रशिक्षक आणि क्रीडाप्रेमींकडून तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून, आगामी लॉस एंजेलिस ऑलिम्पिकमध्ये ती देशासाठी सुवर्णपदक जिंकेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

शेतकरी फासावर लटकत असतांना मंत्र्यांसाठी रेड कार्पेट टाकून कोट्यवधींचा खर्च कशासाठी ?

शेतकरी उपाशी असतांना मंत्र्यांच्या दौऱ्यांवर कोट्यावधींचा खर्च लाजिरवाणी बाब

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२१अमरावती

अमरावती: राज्यात दुष्काळी परिस्थितीची तीव्रता वाढत असताना, अमरावती जिल्हा परिषद प्रशासनाकडून आयोजित करण्यात आलेल्या मुख्यमंत्री पंचायतराज समृद्धी अभियान कार्यक्रमातील अवाढव्य खर्चावर सामाजिक कार्यकर्ते प्रशांत कांबळे यांनी तीव्र शब्दांत टीका केली आहे. शेतकरी विविध संकटांत सापडलेला असताना, सरकारी कार्यक्रमांवर कोट्यवधी रुपयांची उधळपट्टी करून शेतकऱ्यांची थट्टा केली जात असल्याचा आरोप कांबळे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केला आहे.



प्रशांत कांबळे यांनी आपल्या निवेदनात म्हटले आहे की, या कार्यक्रमासाठी मंत्र्यांच्या स्वागताकरिता १५ आलीशान वाहनांचा ताफा आणि पंचतारांकित सुविधांची व्यवस्था करण्यात आली. मात्र, प्रत्यक्षात या कार्यक्रमाला केवळ ग्रामविकास मंत्र्यांचीच उपस्थिती होती. एका बाजूला राज्याचा बळीराजा आर्थिक संकटात असताना, दुसऱ्या बाजूला प्रशासनाकडून अशा प्रकारे कोट्यवधींचा खर्च केला जाणे अत्यंत संतापजनक असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले आहे.राज्य सरकारच्या धोरणांवर आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या घोषणांवर टीका करताना प्रशांत कांबळे यांनी शेतकऱ्यांच्या विविध प्रलंबित समस्यांचा पाढा वाचला आहे. कर्जमाफीच्या घोषणांनंतरही पहिल्या यादीत नाव असलेल्या अनेक शेतकऱ्यांना अद्याप प्रत्यक्ष लाभ मिळालेला नाही. तसेच, सिबिल स्कोअर खराब झाल्याच्या कारणावरून शेतकऱ्यांना बँकांकडून नवीन पीककर्ज नाकारले जात आहे, पीक विमा, खरिपातील नुकसानीची भरपाई आणि बोगस सोयाबीन बियाण्यांमुळे झालेल्या नुकसानीची भरपाई अद्याप शेतकऱ्यांच्या खात्यात जमा झालेली नाही, नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेचा हप्ता, गोधनाशी संबंधित योजना आणि दिवाळी अग्रिम भेटीचे ५ हजार रुपये यांसारख्या सुविधांपासूनही शेतकरी वंचित असल्याचा दावा कांबळे यांनी केला आहे.सरकारने जाहीर केलेल्या दुष्काळातील १२ उपाययोजना केवळ कागदावरच राहिल्या असून, त्या फसव्या ठरल्याची टीका कांबळे यांनी केली आहे. एकीकडे शेतकऱ्यांच्या मूलभूत योजना बंद अवस्थेत असताना, दुसरीकडे जिल्हा परिषद प्रशासनाने कार्यक्रमांवर कोट्यवधी रुपये खर्च करणे हे सरकार आणि प्रशासनासाठी लाजिरवाणे असल्याचे प्रशांत कांबळे यांनी म्हटले आहे.

मंदिरांच्या प्रश्नांवर मुख्यमंत्री फडणवीस यांच्याशी चर्चा

५ डिसेंबरच्या राज्यस्तरीय विश्वस्त परिषदेसाठी दिले निमंत्रण; हसूलमंत्र्यांचीही घेतली भेट



विदर्भ प्रजासत्ताक
दि.२१मुंबई : महाराष्ट्र देवस्थान समितीच्या शिष्टमंडळाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मंत्रालयात भेट घेऊन राज्यातील मंदिरांचे संरक्षण, संवर्धन, देवस्थानांच्या जमिनी तसेच मंदिर विश्वस्तांच्या विविध प्रशासकीय व कायदेशीर समस्यांवर चर्चा केली. यावेळी अमरावती येथे ५ डिसेंबर २०२६ रोजी आयोजित राज्यस्तरीय विश्वस्त परिषदेस उपस्थित राहण्याचे निमंत्रण मुख्यमंत्र्यांना देण्यात आले.महाराष्ट्र देवस्थान समिती व धर्मदाय आयुक्त कार्यालय, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन येथे या परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. विदर्भात प्रथमच होणाऱ्या या परिषदेत राज्यभरातील मंदिरांचे विश्वस्त व पदाधिकारी सहभागी होणार आहेत. शिष्टमंडळाने महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचीही भेट घेऊन मंदिरांच्या जमिनी व इतर समस्यांवर चर्चा केली. यावेळी आमदार प्रतापदादा अडसूळ, आमदार प्रवीणदादा तायडे यांच्यासह महाराष्ट्र देवस्थान समितीचे निलेश टवलारे, कैलाशकुमार पनपालिया, आशिष मारुडकर, कैलाश गिरोळकर, रोहन ढोमणे, विनोद वानखडे, नरेश दिघडे आदी पदाधिकारी उपस्थित होते.मंदिर विश्वस्तांच्या समस्या शासनदरबारी मांडून त्यांच्या निराकरणासाठी प्रभावी व्यासपीठ उपलब्ध करून देणे, हा या राज्यस्तरीय परिषदेचा प्रमुख उद्देश आहे.

संपादकीय .....

भक्तीचा संदेश देशभर पोहोचवणारे संत

भक्ती ही कोणत्याही एका जातीची, धर्माची किंवा वर्गाची मक्तेदारी नसून ती प्रत्येक माणसासाठी आहे, हा विचार संत नामदेवांनी मांडला. महाराष्ट्राच्या संत परंपरेत अनेक संतांनी आपल्या विचारांनी समाजाला नवी दिशा दिली. मात्र, आपल्या अभंगांच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या सीमा ओलांडून संपूर्ण भारतात भक्तीचा संदेश पोहोचवणारे संत म्हणजे संत नामदेव महाराज! विठ्ठलभक्ती, नामस्मरण, सामाजिक समता आणि मानवतेचा संदेश देत त्यांनी वारकरी संप्रदायाच्या विस्तारात मोलाचे योगदान दिले. संत नामदेवांचा जन्म इ. स. १२७० च्या सुमारास नरसी-बामणी येथे झाला, असे मानले जाते. लहानपणापासूनच त्यांची पंढरपूरच्या विठ्ठलावर अपार श्रद्धा होती. विठ्ठलभक्ती हा त्यांच्या जीवनाचा केंद्रबिंदू होता. संत ज्ञानेश्वर महाराजांच्या समकालीन असलेल्या नामदेव महाराजांनी वारकरी संप्रदायातील भक्ती परंपरेला अधिक व्यापक स्वरूप दिले. संत ज्ञानेश्वरांनी ज्ञान आणि भक्तीचा समन्वय साधला; तर नामदेव महाराजांनी अभंग, कीर्तन आणि नामस्मरणाच्या माध्यमातून भक्तीचा संदेश सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवला. त्यांनी महाराष्ट्राबाहेरही प्रवास केला. विशेषतः पंजाबमध्ये जाऊन त्यांनी विठ्ठलभक्ती आणि नामस्मरणाचा संदेश दिला. त्यांच्या रचनांचा समावेश शीख धर्माच्या पवित्र 'गुरुग्रंथसाहिब'मध्ये करण्यात आला आहे. यावरून त्यांच्या विचारांचा प्रभाव महाराष्ट्राच्या सीमा ओलांडून किती दूरवर पोहोचला होता, हे लक्षात येते.संत नामदेव महाराजांच्या शिकवणुकीचा मुख्य आधार म्हणजे ईश्वराचे नामस्मरण. त्यांच्या मते, परमेश्वराची प्राप्ती करण्यासाठी मोठमोठे कर्मकांड किंवा अवघड साधना करण्याची आवश्यकता नाही. निर्मळ मनाने केलेले नामस्मरण आणि निस्सीम भक्ती हाच ईश्वरप्राप्तीचा मार्ग आहे. त्यांनी जातिभेद, उच्च-नीचपणा आणि सामाजिक भेदभावाला आपल्या विचारांतून विरोध केला. प्रत्येक माणसामध्ये परमेश्वराचा अंश आहे. त्यामुळे कोणालाही कमी लेखू नये, सर्वांशी प्रेमाने आणि समानतेने वागावे, हा त्यांच्या विचारांचा गाभा होता. त्यांच्या भक्तीमध्ये केवळ पूजा-अर्चा नव्हती; तर प्रेम, नम्रता, करुणा आणि माणुसकीला विशेष महत्त्व होते.संत नामदेव आणि संत ज्ञानेश्वर यांची मैत्री ही महाराष्ट्राच्या संत परंपरेतील एक महत्त्वपूर्ण घटना मानली जाते. दोघांनीही भक्ती, ज्ञान आणि समाजप्रबोधनाचे कार्य केले. संत ज्ञानेश्वरांसह नामदेवांनी अनेक तीर्थक्षेत्रांना भेटी दिल्या. या प्रवासातून त्यांनी विविध संतांच्या विचारांचा परिचय करून घेतला आणि भक्तीचा संदेश अधिक व्यापक केला. संत नामदेवांच्या जीवनातील महत्त्वाचा प्रसंग म्हणजे विसोबा खेचर यांच्याकडून मिळालेले मार्गदर्शन. या अनुभवानंतर त्यांच्या भक्तीला व्यापक आध्यात्मिक दृष्टी मिळाली. परमेश्वर केवळ मंदिरात किंवा मूर्तीत नसून तो सर्वत्र आहे, ही जाणीव त्यांच्या विचारांतून व्यक्त झाली. संत नामदेवांनी हजारो अभंगांची रचना केल्याचे मानले जाते. त्यांच्या अभंगांची भाषा साधी, सरळ आणि सर्वसामान्यांना समजणारी होती. त्यामुळे त्यांचे विचार समाजातील प्रत्येक स्तरापर्यंत पोहोचले. त्यांच्या रचनांमध्ये विठ्ठलावरील प्रेम, भक्ताची तळमळ, ईश्वराशी असलेले नाते आणि मानवी जीवनाचे तत्त्वज्ञान दिसून येते. त्यांनी कीर्तन आणि अभंगांच्या माध्यमातून लोकांना चांगले आचरण, प्रामाणिकपणा, परोपकार आणि माणुसकीचे महत्त्व समजावून सांगितले. आजही समाजात जातीय भेदभाव, द्वेष, अहंकार आणि असमानता दिसून येते. अशा परिस्थितीत नामदेव महाराजांची शिकवण अधिक महत्त्वाची ठरते. माणसाची ओळख त्याच्या जातीवरून नव्हे, तर त्याच्या विचारांवर आणि कर्मावरून व्हावी, हा त्यांच्या विचारांचा महत्त्वाचा संदेश आहे.

संत नामदेव महाराज हे केवळ विठ्ठलाचे भक्त नव्हते, तर भक्तीच्या माध्यमातून समाजाला जोडणारे महान संत होते. त्यांनी वारकरी संप्रदायाला अभंग, कीर्तन आणि नामस्मरणाची समृद्ध परंपरा दिली. महाराष्ट्रातून पंजाबपर्यंत पोहोचलेली त्यांची भक्ती परंपरा आजही त्यांच्या व्यापक कार्याची साक्ष देते. त्यांचे जीवन आपल्याला एक महत्त्वाची गोष्ट शिकवते – देव शोधण्यासाठी माणसापासून दूर जाण्याची गरज नाही. प्रत्येक माणसामध्ये परमेश्वर पाहण्याची दृष्टी निर्माण झाली; तर तीच खरी भक्ती आहे. म्हणूनच शेकडो वर्षांनंतरही संत नामदेव महाराजांचे विचार समाजाला भक्ती, समता आणि माणुसकीचा मार्ग दाखवत आहेत.

मेळघाटातील गवळी समाजाच्या मागण्या दुर्लक्षित

चराई, शिक्षण, वनहक्क आणि रेल्वे मार्गाचा प्रश्न ऐरणीवर, उपविभागीय अधिकाऱ्यांना निवेदन

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२१चिखलदरा



मेळघाटातील धारणी व चिखलदरा तालुक्यांसह परिसरात वास्तव्यास असलेल्या गवळी समाज आणि भटक्या-विमुक्त बांधवांच्या विविध समस्या मार्गी लावण्यासाठी महाराष्ट्र गवळी समाज संघटनेने पुढाकार घेतला असून या संदर्भात त्यांचा लढा सुरु झाला आहे. समाजाच्या दैनंदिन अडचणी सोडवून न्याय मिळावा, यासाठी सात प्रमुख मागण्यांचे निवेदन धारणी येथील उपविभागीय अधिकाऱ्यांना तहसीलदारांमार्फत देण्यात आले. या मागण्यांवर सविस्तर चर्चा करण्यासाठी संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांसोबत बैठक आयोजित करण्याची मागणीही करण्यात आली आहे. गवळी समाजाचा पारंपरिक व्यवसाय गोपालन, गायी-म्हशींचे पालन आणि दुग्धव्यवसाय हा आहे. मात्र, मेळघाटातील वनक्षेत्रात चराईसाठी असलेले पारंपरिक मार्ग बंद झाल्याने पशुपालन व्यवसाय अडचणीत आला आहे. त्यामुळे समाजाच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. शिक्षणाच्या बाबतीतही समाजातील विद्यार्थ्यांना विविध अडचणींचा सामना करावा लागत आहे. भटकंतीमुळे मुलांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये, त्यांना शैक्षणिक सुविधा व शासकीय योजनांचा लाभ मिळावा, अशी मागणी संघटनेने केली आहे. तसेच समाजाच्या पारंपरिक वास्तव्यासंदर्भातील वनहक्कांचे प्रश्न सोडविणे, पशुधनासाठी चराईची व्यवस्था करणे आणि समाजाच्या विकासासाठी आवश्यक उपाययोजना करण्यावर भर देण्यात आला आहे. रेल्वे मार्गासह इतर प्रलंबित प्रश्नांकडेही निवेदनातून लक्ष वेधण्यात आले आहे. या सातही मागण्यांबाबत महसूल, वन, शिक्षण आणि रेल्वे विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांची संयुक्त बैठक घेऊन प्रश्नांवर ठोस निर्णय घ्यावा, अशी मागणी संघटनेने केली आहे. या प्रसंगी ज्ञानदेव येवले, जगदीश हेकडे, शंकर तोटे, साबूलाल पाटणकर, रामदास भाकरे, मधूभाऊ पाटील, गणपत खडके, जयंत शनवारे यांच्यासह गवळी बांधव उपस्थित होते.

महिला काळजी वाहकाशी असभ्य वर्तनाचा आरोप

शिक्षकाविरुद्ध पोलिसात गुन्हा दाखल



विदर्भ प्रजासत्ताक
दि.२१अमरावती – शहरात एका ठिकाणी काम करणाऱ्या महिला काळजी वाहकासोबत येथील एका विशेष शिक्षकाने असभ्य वर्तन केल्याचा आरोप करण्यात आला. त्याआधारे राजापेठ ठाण्यात संशयित विशेष शिक्षकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संबंधित महिला एका शाळेत काळजीवाहक म्हणून नोकरीला असून, त्याचठिकाणी संशयित व्यक्ती सहाय्यक शिक्षक आहे. शाळेत दुपारच्या सुमारास सर्वांचे वेतन झाले. त्यामुळे महिलेने पगार बिलावर मुख्याध्यापक व कर्मचाऱ्यांची स्वाक्षरी घेतल्यानंतर सदर रजिस्टर हे संशयित शिक्षकाच्या टेबलवर ठेवले. त्यावेळी संशयिताने पिडीत महिलेसोबत अश्लील भाषेत संभाषण केले. पीडित काळजीवाहक महिलेने या घटनेची तक्रार शाळेच्या महिला तक्रार निवारण समितीकडे केली होती. चौकशी अधिकाऱ्यांनी प्रक्रिया पूर्ण करून या घटनेसंदर्भात राजापेठ ठाण्यात तक्रार नोंदविली असता, पोलिसांनी संशयित विशेष शिक्षकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. त्यात अद्याप संशयितास अटक करण्यात आली नाही. ही घटना १३ जुलै २०२५ ते २५ सप्टेंबर २०२५ या कालावधीतील आहे.

कंत्राटी कर्मचाऱ्यांना सेवेत घेण्याचा प्रस्ताव मंजूर

सत्ताधारी व विरोधकांचे एकमत : शासनाकडे करणार पाठपुरावा

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२१अमरावती – महापालिकेच्या विविध विभागांमध्ये बाह्य यंत्रणांमार्फत कंत्राटी तत्वावर सेवा देणाऱ्या कर्मचाऱ्यांना अस्थाई आस्थापनेवर सामावून घेण्याचा प्रस्ताव सभागृहाने शासनाकडे पाठविला आहे. सत्ताधारी व विरोधी पक्ष यांच्यात या मुद्दयावर एकमत असल्याने त्यास बळकटी आली असून या प्रस्तावाचा सामुहिक पाठपुरावा करण्याचा निर्धारही व्यक्त करण्यात आला आहे. आस्थापना खर्च अधिक असल्याने महापालिकेत नोकर भरतीवर शासनाचे निर्बंध आहेत. अनेक पदे रिक्त असून आकृतीबंध मंजूर असतानाही मनपा प्रशासनाला नोकरभरती करता येत नाही. अनेक कर्मचारी सेवानिवृत्त झाले असल्याने विविध विभागांतील रिक्त पदांची संख्या मोठी आहे. मात्र शासकीय निर्बंधांमुळे भरती करण्यात अडचणी असल्याने कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या भरोशावर महापालिकेचा गाडा ओढल्या जात आहे. सद्यस्थितीत महापालिकेत ७९६ कंत्राटी कर्मचारी कार्यरत आहेत. यातील बहूतांश कर्मचाऱ्यांची कंत्राटी तत्वावरील सेवा दहापेक्षा अधिक कालावधीचा झाला आहे. अनेक जणांचे वय शासकीय नोकरीसाठी बाद झाले आहे. त्यांना आता नोकरी मिळण्याची शक्यता संपुष्टात आली आहे. हा धागा पकडून सभागृह नेते चेतन गावंडे व विरोधी पक्षनेते विलास इंगोले यांनी वय झालेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना महापालिकेच्या अस्थाई सेवेत सामावून घेण्याचा प्रस्ताव आमसभेत मांडला होता. या प्रस्तावास सत्ताधारी व विरोधी अशा दोन्ही बाकांहून समर्थन देण्यात आले. प्रस्ताव मंजूर करण्यात येऊन तो शासनाकडे पाठविण्यात येणार आहे. याशिवाय या प्रस्तावाचा सामुहिक पाठपुरावा करण्याचा निर्धारही करण्यात आला. शासनाने या प्रस्तावास मंजूरी दिल्यास त्याचा ४०० च्या जवळपास कंत्राटी कर्मचाऱ्याना लाभ मिळणार आहे.



आम्ही सदैव कर्मचारी व अधिकारी यांच्या पाठीशी आहोत. महापालिकेच्या विकासात कंत्राटी कर्मचाऱ्यांचे योगदान मोठे असून ते दुर्लक्षीत करता येत नाही. त्यांच्या भविष्यासाठी हा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात येत असून तो मंजूरही करून घेण्यासाठी आमची संयुक्त लढाई सुरू राहणार आहे. शेवटी या कर्मचाऱ्यांना सुरक्षीतता देणे हे आमचे कर्तव्य आहे.

-विलास इंगोले, विरोधी पक्षनेते, महापालिका.

कोरोना काळापुर्वी सेवेत असलेले व कोरोना काळात सेवा देणाऱ्या कंत्राटी कर्मचाऱ्यांचा प्राधान्याने विचार करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे गेल्या दहापेक्षा अधिक काळापासून कार्यरत कर्मचाऱ्यांच्या वयाचा विचार करून सुरक्षीततेच्या व मानविय दृष्टीकोनातून त्यांना आस्थापनेवर घेण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला. सभागृहात त्यास मंजूरी देण्यात आली असून आता शासनदप्तरीही त्याचा पाठपुरावा करण्यात येणार आहे.

- चेतन गावंडे, सभागृह नेता, महापालिका.

प्रवासी निवारा की दुर्गंधीचे आगार?

पथ्रोटमध्ये स्वच्छतेचा उडाला बोजवारा!

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२१पथ्रोट राष्ट्रीय महामार्गावरील पथ्रोटच्या बस स्टॅण्डवर मुख्य भागात प्रवाशांच्या सोयीसाठी प्रवासी निवारा उभारण्यात आला आहे. मात्र प्रवासी निवाऱ्याच्या अंतर्गत स्वच्छतेकडे पूर्णतः दुर्लक्ष होत असल्याने आत मध्ये भिक्षेकऱ्यांच्या वास्तव्यामुळे साचलेल्या कचऱ्यात गलिच्छ परिस्थितीत प्रवाशांना वाहनांची वाट पाहत उभे राहणे कठीण होऊन बसले आहे. या प्रवासी निवाऱ्याकडे या परिसरातील लोकप्रतिनिधी लक्ष देतील का?असा प्रश्न ग्रामस्थ विचारत आहेत.

राज्य महामार्ग असताना येथील बस स्टॅण्डवर प्रवाशांच्या सोयीकरिता लोखंडी अँगलचे प्रवासी निवारा म्हणून एक शेड उभारण्यात आले होते. ते शेड क्षतिग्रस्त झाल्यानंतर त्या ठिकाणी सिमेंट काँक्रिटचा प्रवासी निवारा बांधण्यात आला आहे. पुढे राज्य महामार्गाचे राष्ट्रीय महामार्गात रूपांतर झाल्यावर चार पदरी सिमेंट काँक्रिटचा रस्ता तयार करण्यात आला. तेव्हा या महामार्गावरील पावसाळ्यातील पाणी व्यवस्थित वाहून जाण्यासाठी रस्त्याच्या कडेला नालीचे बांधकाम करणे सुरू झाले होते. तेव्हा बांधकामात मध्यभागी येत न करता त्याच्या मागून नालीचे बांधकाम पुढे नेले. अशातच ७ जानेवारी २०२४ ला महामार्गावर धावत असणारा एक ट्रक अचानकपणे या प्रवासी निवाऱ्याला येऊन धडकला होता. त्यामध्ये निवाऱ्याचे एका बाजूचे कॉलम पूर्णतः तुटून लगतच्या दोन बाजूच्या भिंतींचा सुद्धा चुरा झालेला होता. तेव्हा त्याची दुरुस्ती हद्दीच्या वादात अनेक दिवसांपर्यंत रखडलेली होती. अर्धवट तुटलेल्या स्थितीतच प्रवासी भीत भीत या निवाऱ्याचा वापर करीत होते. अखेर महामार्ग बांधकाम विभागाने ते कॉलम दुरुस्त करून दिले. परंतु निवाऱ्याच्या दोन्ही बाजूच्या तुटलेल्या आवार भिंती व आतील प्रवाशांच्या बसण्यासाठी असणारा ओटा दुरुस्त करून देण्यात दुर्लक्ष केले. त्यावरून दोन वर्षाचा कालावधी पूर्ण झाला असतानाही तो दुर्लक्षितच असल्याने त्या ठिकाणी अर्ध्या जागेचा वापर सुरू आहे.



लोकप्रतिनिधी लक्ष देणार का?

असलेला हा प्रवासी निवारा शंभर टक्के तुटणार या स्थितीत होता. परंतु गावाची वाढत चाललेली लोकसंख्या, दैनंदिन महिला पुरुषांचे वाढलेले दळणवळण, बाहेर गावात शिक्षण घेण्यासाठी येजा करणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या ही मोठी आहे. अशा सर्व प्रवाशांना बस स्टॅण्डवर आल्यावर वाहनांची वाट पाहताना उभे राहण्यासाठी निवाऱ्याचा आधार घ्यावा लागतो. अशावेळी तो जर तुटला तर उन्हातान्हात व पावसाळ्यात बस स्टॅण्डवर वाहनांची वाट पाहताना उभे राहणे खूपच गैरसोयीचे होईल. याचा विचार करून महामार्ग बांधकाम विभागाने त्याची तोडफोड

पाणीटंचाई निवारणासाठी प्रशासनाने सज्ज राहावे

आमदार केवलराम काळे : तालुकास्तरीय समन्वय समितीची बैठक

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२१मेळघाट



तालुक्यातील संभाव्य पाणीटंचाई, चाराटंचाई तसेच विविध शासकीय योजनांच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्यासाठी आमदार केवलराम काळे यांच्या अध्यक्षतेखाली चिखलदरा येथे तालुकास्तरीय समन्वय समितीची बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीत विविध विभागांच्या कामकाजाचा आढावा घेत आमदार काळे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना दिल्या. यावेळी तालुक्यातील ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याची उपलब्धता, पाणीपुरवठा योजनांची सद्यस्थिती, संभाव्य टँकर नियोजन, जलसंधारणाची कामे तसेच जनावरांसाठी चारा उपलब्धता या विषयांवर चर्चा करण्यात आली. उन्हाळ्यात नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी अडचणी निर्माण होऊ नयेत, यासाठी प्रशासनाने आतापासूनच गावनिहाय नियोजन करावे. ज्या गावांमध्ये पाणीटंचाई निर्माण होण्याची शक्यता आहे, अशा गावांची यादी तयार करून आवश्यक उपाययोजना वेळेत पूर्ण कराव्यात, असे निर्देश आमदार काळे यांनी दिले. बैठकीत शेतकऱ्यांच्या दृष्टीने महत्त्वाच्या असलेल्या ई-पीक पाहणी व फार्मर आयडी नोंदणीचा मुद्दा विशेषत्वाने उपस्थित करण्यात आला. तालुक्यातील सर्व शेतकऱ्यांची ई-पीक पाहणी आणि फार्मर आयडी नोंदणी ३० नोव्हेंबरपर्यंत पूर्ण करण्याचे निर्देश आमदारांनी तहसीलदार व तालुका कृषी अधिकारी यांना दिले. ई-पीक पाहणी व फार्मर आयडी नोंदणीअभावी कोणताही पात्र शेतकरी शासनाच्या विविध योजना, अनुदान, पीक विमा व इतर शासकीय लाभांपासून वंचित राहू नये यासाठी गावपातळीवर विशेष मोहीम राबवावी, तलाठी, कृषी सहाय्यक व संबंधित कर्मचाऱ्यांनी समन्वयाने काम करावे. तसेच दररोज झालेल्या कामाचा गावनिहाय प्रगती अहवाल सादर करावा, अशा सूचनाही त्यांनी दिल्या. या बैठकीला उपविभागीय अधिकारी किसन तळवी, तहसीलदार जीवन मोरनकर, गट विकास अधिकारी विनोद खेडेकर, विभागीय वनाधिकारी अनंत डीगोडे, नगरपरिषद मुख्याधिकारी, तालुका अध्यक्ष आलोक अलोकार, गटनेते राजेश मांगलेकर, शैलेश म्हाला, आकाश खैरकर यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी, मंडळ अधिकारी, ग्रामसेवक व पदाधिकारी उपस्थित होते.

पाणीटंचाई निवारण, चारा उपलब्धता आणि शेतकऱ्यांच्या विविध समस्या सोडविण्यासाठी सर्व शासकीय विभागांनी परस्पर समन्वय ठेवून काम करावे. अधिकाऱ्यांनी केवळ कागदोपत्री अहवाल न देता प्रत्यक्ष गावपातळीवर भेटी देऊन परिस्थितीची पाहणी करावी आणि नागरिकांच्या तक्रारींचे वेळेत निराकरण करावे, असेही आमदार काळे यांनी स्पष्ट केले.

शहरातील तीन युवतींचे अपहरण

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२१अमरावती

शहरातील फ्रेजरपुरा हद्दीतील दोन तर, बडनेरा हद्दीतुन एक अशा तीन युवतींचे अपहरण करण्यात आल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला. फ्रेजरपुरा हद्दीतील एक युवती कुणालाही काही न सांगता घरुन निघून गेली. मुलीला संशयित सम्यक अन्ना तायडे या युवकाने पळवून नेल्याचा आरोप अपहृत मुलीच्या पालकांनी तक्रारीत केला आहे. फ्रेजरपुरा हद्दीतील दुसरी एक युवती किराणा दुकानात जाते असे सांगुन घरुन निघून गेली. तिच्या पालकांच्या तक्रारीवरुन फ्रेजरपुरा ठाण्यात अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात आला. बडनेराहद्दीत युवतीला संशयित सुरज अशोक सुखदेवे (वय २६) या युवकाने फूस लावून पळवून नेले. असा आरोप मुलीच्या पालकांनी केल्यानंतर बडनेरा ठाण्यात संशयित सुरज सुखदेवेविरुद्ध अपहरणाचा गुन्हा दाखल केला आहे.


आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर
पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / PDF / वेब – पोर्टल /ई – पेपर

सहायक आयुक्तांच्या अंगावर धावून गेला नगरसेवक गव्हाळेंचा सहकारी



विदर्भ प्रजासत्ताक
दि.२१अमरावती– झोन क्र. ३ दस्तुरनगर कार्यालयात जुन्या बायपासवरील राज मंगल कार्यालय राजमहालला गुरुवारी १९ रोजी सील ठोकल्याने सहायक आयुक्त नितीन बोबडे यांना विचारणा करण्यास आलेले शिवसेनेचे नगरसेवक संजय गव्हाळे, त्यांचे सहकारी सोहम सोळंके यांच्या शाब्दिक चकमक झाली. नंतर वातावरण असे काही तापले की, सोळंके यांनी धाऊन जात टेबलवर सहायक आयुक्तांकडे भिरकावले. या प्रकारामुळे उपस्थितांनी तत्काळ सोळंके यांना पकडून बाहेर नेले व सहायक आयुक्तांचा बचाव केला.मालमत्ता कराचे १३.९५ लाख रु. राज मंगल कार्यालय राजमहालकडे थकित असल्यामुळे सहायक बोडबे यांच्या नेतृत्त्वात या मालमत्तेला मनपाच्या पथकाने गुरुवारी सील ठोकले होते. याबाबत विचारणा करण्यासाठी नगरसेवक संजय गव्हाळे आले होते. तिकडे बोबडे यांनी या प्रकरणी मारहाणीचा प्रयत्न केल्याची तक्रार पोलिसांत दिली.

दरम्यान त्यावेळी तेथे उपस्थित सभापती लालूवाले व नगरसेवक वैद्य यांनी हस्तक्षेप करीत गव्हाळे यांना कक्षाबाहेर नेत प्रकरण शांत करण्याचा प्रयत्न केला. घटना घडल्यानंतर यासंदर्भात महापालिका कर्मचारी व अधिकाऱ्यांनी चिंता व्यक्त केली आहे. नगरेसवकांकडून अशा प्रकारे वर्तणूक करण्यात येत असेल तर आमच्या सुरक्षेचे काय? असा त्यांचा प्रश्न आहे. त्यांनी आयुक्तांनाही यासंदर्भात कळविले आहे.



अरेरावी, उर्मट भाषा वापरल्याने सहकारी चिडला



सहायक आयुक्त नितीन बोबडे यांनी माझ्यासोबत एकेरी भाषेत व अरेरावीने बोलत जा, तुला जे करायचे ते करून घे, माझे कोणी काही करू शकत नाही, असे मुजोरपणाचे उत्तर दिले. या संपूर्ण घटनेचे साक्षीदार झोन सभापती इस्माईल लालूवाले आणि नगरसेवक सचिन वैद्य आहेत. लोकप्रतिनिधींचा आणि त्यांच्या सहकाऱ्यांचा अशा प्रकारे अपमान करणे खपवून घेतला जाणार नाही. महापालिका आयुक्तांनी या प्रकरणाची तातडीने दखल घेऊन संबंधित अधिकाऱ्याची चौकशी करावी व त्यांच्यावर कठोर शिस्तभंगाची कारवाई करावी. **संजय गव्हाळे,** नगरसेवक, प्रभाग क्र. २० सुतगिरणी.

सहकाऱ्याने शिवीगाळ करून पॅड मारला

संजय गव्हाळे व त्यांचे सहकारी सोहम सोळंके यांनी एमआयडीसी रोडवरील राज मंगल कार्यालय सील केल्या संदर्भात माझ्या कक्षामध्ये येऊन शिविगाळ करून रायटिंग पॅड माझ्या डोक्यावर फेकून मारला.

– नितीन बोबडे, सहायक आयुक्त, झोन क्र. ३ दस्तूरनगर.

महात्मा फुले मागासवर्ग महामंडळाकडून होणार सर्वेक्षण :लाभार्थ्यांच्या प्रगतीची प्रत्यक्ष पाहणी

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२१अमरावती

महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाच्या विविध कर्ज योजनांचा लाभ घेतल्यानंतर लाभार्थ्यांच्या आयुष्यात नेमका किती बदल झाला? कर्जातून सुरू केलेला व्यवसाय किती प्रगत झाला? उत्पन्नात वाढ झाली का आणि किती जणांना रोजगार मिळाला? या प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी आता महामंडळाच्या कर्ज लाभार्थ्यांचे सर्वेक्षण केले जाणार आहे.

महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळामार्फत मागासवर्गीय समाजातील घटकांचे आर्थिक व सामाजिक उत्थान करण्यासाठी विविध कर्ज योजना राबविल्या जातात. स्वयंरोजगाराला चालना देणे, नव्याने व्यवसाय सुरू करण्यासाठी आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देणे आणि लाभार्थ्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे हा या योजनांचा मुख्य उद्देश आहे .सर्वेक्षणादरम्यान लाभार्थ्यांनी घेतलेल्या कर्जाचा नेमका वापर कशासाठी केला, कर्जातून सुरू केलेला व्यवसाय सध्या सुरू आहे की बंद पडला, व्यवसायाच्या उलाढालीत व उत्पन्नात किती बदल झाला, याची माहिती संकलित केली जाणार आहे.यासोबतच व्यवसायातून किती जणांना रोजगार उपलब्ध झाला, व्यवसाय करताना कोणत्या अडचणींचा सामना करावा लागत आहे आणि कर्जाची परतफेड नियमित सुरू आहे का, याचाही आढावा घेतला जाणार आहे.–

सावकार दाम्पत्याविरुद्ध पोलिसांत गुन्हे दाखल

अवैध सावकारी प्रकरणी सहकार विभागाची कारवाई

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२१अमरावती

अवैध सावकारी प्रकरणात सहकार विभागाने पती व पत्नी अशा दोन सावकारांविरूद्ध पोलिसात सावकारी अधिनियमान्वये गुन्हे दाखल केले आहेत. यापुर्वी याच प्रकरणात एका सावकाराविरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून चौथा सावकार मृत पावला असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. नांदगावपेठ येथील प्रकाश देविदास राऊत व संजय देविदास राऊत यांनी नीलेश रमेश ठाकरे (रा. रहाटगाव), गोपाल रतनलाल राठी (रा.हॉटल श्रीपाद कॉन्टीनेंटलजवळ, अमरावती), मदनलाल रतनलाल राठी व त्यांच्या पत्नीविरुद्ध (रा.प्रथमेश अपार्टमेंट, दुर्गा विहार अमरावती) अवैध सावकारीची तक्रार दाखल केली होती. या तक्रारीवरून जिल्हा उपनिबंधकांनी चार स्वतंत्र पथक गठीत करून चारही सावकारांच्या निवासस्थानी घाडसत्र राबविले. यामध्ये संशयास्पद कोरे धनादेश, कोरे स्टॅम्प पेपर, स्वाक्षरी असलेले कोरे स्टॅम्प पेपर, खरेदी खत व जमा चिठ्ठी असा दस्तवेज जप्त करण्यात आला. जप्त करण्यात आलेल्या कागदपत्रांची पडताळणी केल्यानंतर या प्रकरणांत नीलेश ठाकरे याच्याविरुध गुरूवारी (ता.१९) नांदगाव पेठ पोलिस ठाण्यात तर शुक्रवारी (ता.२१) सावकार रतनलाल राठी व त्यांच्या पत्नीविरूद्ध सहकार अधिकारी मनोज रोहणकर यांच्या तक्रारीवरून राजापेठ पोलिस ठाण्यात सावकारी अधिनियमान्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. या प्रकरणातील चौथा सावकार गोपाल राठी यांचे निधन झाले असल्याने त्याच्याविरूद्ध फौजदारी कारवाई करता आली नसल्याचे सहकार अधिकारी सुधीर मानकर यांनी सांगितले.

सोळा दिवसांत पाच सावकारांवर कारवाई सहकार विभागाने ३ ते १९ नोव्हेंबर या सोळा दिवसांच्या कालावधीत अवैध सावकारी प्रकरणांत पाच फौजदारी कारवाई केली आहे. तिवसा व मोर्शी येथील प्रकरणातील ही कारवाई असून शेतकरी आत्महत्या प्रकरणातील दोन सावकारांचाही यामध्ये समावेश आहे. तिवसा, चांदूरबाजार, गाडगेनगर, राजापेठ व नांदगावपेठ या पोलिस ठाण्यांमध्ये हे गुन्हे दाखल झाले आहेत. जिल्हा उपनिबंधक राजेश भुयार यांच्या मार्गदर्शनात या कारवाया करण्यात आल्या.

मृणाली निचत बनली बालसंसदेची मुख्यमंत्री

राज्यस्तरीय बाल संसदेत अमरावतीचा गौरव, १०२ प्रतिनिधींचा सहभाग

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२१अमरावती–

महाराष्ट्र राज्य बालहक्क संरक्षण आयोग, यशदा आणि युनिसेफ यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक बालदिनानिमित्त पुणे येथे आयोजित राज्यस्तरीय बाल संसद उपक्रमात अमरावती जिल्ह्यातील यावली शहीद येथील मृणाली कमलेश निचत हिची राज्याच्या बाल संसदेच्या पहिल्या मुख्यमंत्रीपदी निवड करण्यात आली. अमरावतीठी ही अत्यंत अभिमानास्पद आणि गौरवास्पद बाब मानली जात आहे. बाल संसदेची प्रथम मुख्यमंत्री होण्याचा बहुमान मिळविणारी मृणाली निचत ही चांदूरबाजार येथील जगदंब हायस्कूलची विद्यार्थिनी आहे. या राज्यस्तरीय उपक्रमात महाराष्ट्रातील ३४ जिल्ह्यांमधील १०२ गावांतील बालकांनी सहभाग नोंदविला. विविध जिल्ह्यांतील बालकांनी आपल्या गावातील व परिसरातील शिक्षण, आरोग्य, पाणी, स्वच्छता, पोषण, बालसुरक्षा आणि इतर मूलभूत समस्यांचे प्रश्न बाल संसदेत मांडले. बाल संसदेच्या मुख्यमंत्री व संबंधित मंत्र्यांनी या प्रश्नांना उत्तरे देत बालकांच्या समस्या समजून घेतल्या. या माध्यमातून बालकांना लोकशाही, संसदीय कामकाज आणि निर्णयप्रक्रियेचा प्रत्यक्ष अनुभव मिळाला. या उपक्रमासाठी महाराष्ट्रातील सहा विभागांमधून एकूण १२ बालप्रतिनिधींची निवड करण्यात आली. त्यामधून मुख्यमंत्री, विधानसभा अध्यक्ष, विरोधी पक्षनेता तसेच विविध खात्यांच्या मंत्र्यांची निवड करून प्रत्यक्ष संसदीय कामकाजाच्या धर्तीवर बाल संसदेचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाला महाराष्ट्र राज्याच्या महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी पूर्णवेळ उपस्थित राहून प्रतिनिधींचा उत्साह वाढविला. कार्यक्रमाला महाराष्ट्र राज्य बालहक्क संरक्षण आयोगाचे अध्यक्ष ड. संजय पुराणिक, सदस्य संजय लाखे-पाटील, अमरावतीचे प्रवीण भुजाडे, अतुल देसाई, गीतांजली बुटी, मीनल जंगम, शुभांगी ताबंट, आयोगाच्या सचिव वंदना जैन, यशदाचे मल्लिनाथ कलशेट्टी, युनिसेफचे संजय सिंग, देविका देशमुख, ख्रिस्तो जॉर्ज यांच्यासह संबंधित अधिकारी व मान्यवर उपस्थित होते.



बालकांचे प्रश्न केवळ ऐकले जाण्यापुरते मर्यादित न राहता, त्यांच्या प्रश्नांना धोरणात्मक निर्णयप्रक्रियेत स्थान मिळावे, त्यांच्यामध्ये नेतृत्वक्षमता व निर्णय घेण्याचा आत्मविश्वास निर्माण व्हावा, यासाठी बाल संसद हा अत्यंत महत्त्वपूर्ण उपक्रम आहे. अमरावती जिल्ह्यातील मृणाली निचत हिची या बाल संसदेच्या मुख्यमंत्रीपदी झालेली निवड ही जिल्ह्यातील बालकांच्या नेतृत्वक्षमतेची आणि गुणवत्तेची पावती आहे.

प्रवीण भुजाडे, सदस्य, महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग, मुंबई.

विद्यार्थी-शिक्षकांना दिलासा थेट डिसेंबरमध्ये पॅट चाचणी

मुख्याध्यापक व शिक्षक संघटनांच्या विरोधानंतर 'एससीईआरटी'चा निर्णय

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२१अमरावती

दिवाळीची सुटी संपताच लगेच होणाऱ्या संकलित मूल्यमापन (पॅट) परीक्षेला मुख्याध्यापक आणि शिक्षक संघटनांनी तीव्र विरोध दर्शविल्यानंतर राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेने (एससीईआरटी) महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. ही चाचणी आता दिवाळीनंतर तातडीने न घेता थेट डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यात घेतली जाणार आहे. या निर्णयामुळे जिल्ह्यातील सुमारे दोन लाखांवर विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी पुरेसा अवधी मिळणार असून, शिक्षक व मुख्याध्यापकांनाही मोठा दिलासा मिळाला आहे.दिवाळीच्या सुटीनंतर लगेचच परीक्षांचे नियोजन केल्याने विद्यार्थ्यांची पुरेशी तयारी झालेली नव्हती, तर दुसरीकडे सुटीच्या कालावधीत नियोजन व तयारीसाठी शिक्षकांवरही ताण येत होता. संघटनांच्या मागणीची दखल घेत वेळापत्रकात बदल करण्यात आल्याने आता शाळा स्तरावर सुसूत्रता येण्यास मदत होणार आहे.मुख्याध्यापक व शिक्षक संघटनांच्या विरोधानंतर सुधारित नियोजनानुसार ही चाचणी थेट डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यात होणार आहे. शाळांनी त्यानुसार अंतर्गत सराव व उजळणीचे वेळापत्रक तयार करून विद्यार्थ्यांना पूर्वतयारी करून घ्यावी, असे अपेक्षित आहे.



२६ नोव्हेंबरला लोकगीत, लोकनृत्य व पथनाट्य स्पर्धा

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२१अमरावती क्रीडा व युवक सेवा संचालनालय आणि जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयातर्फे नशामुक्त युवा फॉर विकसित भारत संकल्पनेवर आधारीत जिल्हास्तरीय युवा महोत्सव २६ नोव्हेंबर रोजी आयोजन करण्यात आला आहे. विकसित भारत २०४७ च्या दृष्टिकोनाशी जोडलेल्या या महोत्सवात १५ ते २९ वयोगटातील युवक-युवतींनी सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे. जानेवारी २०२७ मध्ये दिल्ली येथे सांस्कृतिक ट्रॅक, विकसित भारत चॅलेंज ट्रॅक, इनोव्हेशन ट्रॅक आणि युवा संसद या चार विभागांमध्ये राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धा होणार आहेत. त्यानुसार २३ नोव्हेंबर रोजी सकाळी १० वाजल्यापासून विकसित भारत यंग लिडर्स डॉयलॉग २०२७ चॅलेंज ट्रॅक अंतर्गत निबंध लेखन टप्प्यातून पात्र ठरलेल्या स्पर्धकांची जिल्हा अजिंक्यपद स्पर्धा होईल. यासाठी नावीण्यपूर्ण अर्थव्यवस्था, पर्यटन आणि सर्जनशील उद्योग हा विषय आहे. तसेच सांस्कृतिक कार्यक्रमांतर्गत चित्रकला व कविता लेखन स्पर्धा होणार आहे. या स्पर्धा विभागीय क्रीडा संकुलातील कॉन्फरन्स हॉल येथे होतील. तसेच २६ नोव्हेंबर रोजी सकाळी १० वाजल्यापासून सांस्कृतिक कार्यक्रमांतर्गत लोकगीत, लोकनृत्य व पथनाट्य स्पर्धा संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर दृकश्राव्य सभागृहात होणार आहे. या स्पर्धांमध्ये सहभागी होण्यासाठी १७ ऑगस्ट रोजी १५ ते २९ वर्षे वयोगटातील युवक-युवती सहभागी होऊ शकतील. जन्मतारखेचा पुरावा म्हणून जन्माचा दाखला व ओळखपत्रासह आधारकार्ड जोडणे आवश्यक आहे. जिल्हास्तरावर प्राविण्य प्राप्त करणाऱ्या संघ आणि कलाकारांना विभाग, राज्य आणि त्यानंतर राष्ट्रीय युवा महोत्सवात सहभागी होण्याची संधी मिळणार आहे. प्रत्येकस्तरावर यशस्वी ठरणाऱ्यांना शासनाकडून रोख पारितोषिक दिले जाईल.



घर कर्जासाठी रिटर्नची सक्ती नको

शिवसेनेची राज्य सरकारकडे मागणी, जिल्हाधिकाऱ्यांना दिले निवेदन

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२१अमरावती

घर कर्जासाठी रिटर्नची सक्ती करू नये. उत्पन्न दाखला व बँक व्यवहार ग्राह्य धरावा तसेच कर्ज घेतले म्हणून लाडकी बहीण योजना बंद करू नये, यासह इतर महत्त्वाच्या मुद्द्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी शिवसेनेच्या वतीने (उबाठा) च्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक देण्यात आली. यावेळी मागणीचे निवेदन सादर करण्यात आले. शिवसेनेचे शहर प्रमुख प्रवीण हरमकर यांच्या नेतृत्वात शिवसैनिकांनी आज जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक दिली. घर कर्जासाठी रिर्टन्सची सक्ती केली जाते, मात्र अनेक गरीब कुटुंबातील लोकं रिटर्न भरत नसल्याने त्यांनी घरेच घेऊ नये का, असा प्रश्न यावेळी प्रवीण हरमकर यांनी उपस्थित केला. रिटर्न भरला नाही तर लोन नाही, रिटर्न भरून लोन घेतलं तर लाडकी बहीणचे १५०० रुपयांचे अनुदान बंद आणि रेशन कार्डातून धान्य बंद, हा गरीब व आर्थिकदृष्ट्या कमकुवत घटकांवर अन्याय असल्याचा आरोप यावेळी करण्यात आला. यासोबतच रिटर्न भरला म्हणून रेशनकार्डमधून नाव काढू नये, धान्य पूर्ववत चालू करावे, उत्पन्न दाखला हा स्व-घोषणापत्र व खऱ्या पुराव्यावर ठरवावा तसेच आई-वडिलांनी फ्लॅट घेतला म्हणून भविष्यात मुलांच्या शिक्षणावरील शिष्यवृत्ती, फी माफी, आर्थिकदृष्ट्या कमकुवताना मिळणाऱ्या सवलतीवर कोणतीही बंदी आणू नये आदी मागण्यांचे निवेदन देण्यात आले. यावेळी प्रवीण हरमकर यांच्यासह बंडू धामणे, विनोद मंडळकर, डॉ. चंद्रशेखर गिरी, अजय बोबडे, आनंद सोलंकी, कमलेश गुप्ता, अजीज खान सय्यद शकील, गोविंदा दायमा, राजू हेरे, विजय ठाकरे, नितीन तारेकर, मनीष रामावत, संदीप मानेकर, रूपेश आलकरी, दीपक पच्चीगर, प्रमोद वानखडे, रामा सोळंके, पंजाबराव तायवाडे, सनी पासवान, आनंद राठी, अभय टवानी, सुनील यादव आदी पदाधिकारी उपस्थित होते.



कृतज्ञता, अभिमान आणि आनंदाची पर्वणी ठरला 'प्रभास' सन्मान सोहळा!

कर्णबधिर मुलांच्या सक्षमीकरणासाठी समर्पित 'एकवीरा मल्टिपर्पज फाउंडेशन'चा गौरव

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२१अमरावती

समाजातील वंचित आणि गरजू घटकांच्या आयुष्यात आशेचा किरण निर्माण करीत त्यांच्या सक्षमीकरणासाठी निःस्वार्थ भावनेने कार्य करणाऱ्या एकवीरा मल्टिपर्पज फाउंडेशन, अकोला या संस्थेच्या सामाजिक योगदानाचा गौरव करणारा चौथा 'प्रभास सन्मान' सोहळा कृतज्ञता, अभिमान आणि आनंदाची पर्वणी ठरला. जन्मतः श्रवणदोष असलेल्या मुलांना संवादाचे माध्यम उपलब्ध करून देत त्यांना आत्मनिर्भर बनविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करणाऱ्या संस्थेच्या संस्थापक अध्यक्षा सुचेता श्रीकांत बनसोड यांना हा सन्मान प्रदान करण्यात आला. त्यांच्या कार्यातून समाजसेवेचा एक प्रेरणादायी आदर्श उपस्थितांसमोर उभा राहिला.

दैनिक हिंदुस्थानच्या आधारवड स्व. प्रभा अरुण मराठे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या संस्था आणि व्यक्तींच्या कार्याचा गौरव करण्यासाठी दैनिक हिंदुस्थानतर्फे दरवर्षी 'प्रभास सन्मान' प्रदान केला जातो. यंदा या पुरस्काराचे चौथे वर्ष होते.

शुक्रवार, २० नोव्हेंबर रोजी सायंकाळी स्थानिक श्याम चौकातील जोशी हॉल येथे हा सन्मान सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी स्वानंद समुपदेशन केंद्राच्या संचालिका तथा ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या डॉ. मोहना कुळकर्णी होत्या.

प्रमुख अतिथी म्हणून भारत सरकारचे माजी परराष्ट्र सचिव ज्ञानेश्वर मुळे, डॉ. साधना शंकर, पुरस्कारार्थी सुचेता व श्रीकांत बनसोड आणि डॉ. अविनाश मोहरील उपस्थित होते.दीपप्रज्वलन, माता सरस्वती पूजन आणि दैनिक हिंदुस्थानच्या वाटचालीत मोलाचे योगदान देणाऱ्या मराठे परिवारातील दिवंगत व्यक्तिमत्वाच्या स्मृतिपूजनाने कार्यक्रमाचा प्रारंभ झाला. यावेळी मान्यवरांनी आपल्या मनोगतातून मानवतावाद, सामाजिक एकात्मता आणि समाजाप्रती प्रत्येक व्यक्तीच्या कर्तव्याचे महत्त्व अधोरेखित केले.

सुरुवातीचा प्रवास अत्यंत खडतर होता. मात्र कार्यामागील भावना निर्मळ आणि समाजाप्रती असलेली तळमळ प्रामाणिक असल्याने अडचणींवर मात करता आली. आजवर २५० पेक्षा अधिक कर्णबधिर मुलांना सक्षम करण्याचे समाधान लाभले आहे. आयुष्यात येणाऱ्या सुख-दुःखांकडे देवाचा प्रसाद म्हणून पाहत समाजासाठी आपले योगदान असावे, या उदात्त भावनेतून हे कार्य सुरू ठेवले. या कार्याची दखल घेत मिळालेला प्रभास सन्मान ही केवळ पुरस्काराची पावती नसून पुढील वाटचालीसाठी नवी प्रेरणा असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. यावेळी त्यांनी प्रभास आयोजन समितीचे आभार मानले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. अविनाश मोहरील यांनी केले. संचालन वसुंधरा काशिकर यांनी, सन्मानपत्राचे वाचन रसिका वडवेकर तर आभार सर्वेश मराठे यांनी मानले. व्यासपीठावर उपस्थित पाहुण्यांचे स्वागत दै. हिंदुस्थान चे प्रबंध संपादक विलास अ. मराठे, कार्यकारी व्यवस्थापक विवेक अ. मराठे, विनोद मराठे, वेदश्री विलास मराठे, मनीषा विनोद मराठे, डॉ. वृंदा विवेक मराठे, मिताली मराठे यांनी केले.

कार्यक्रमाला माजी पालकमंत्री डॉ. सुनिल देशमुख, राज्य माहिती आयुक्त अरुण डोंगरे, महाबिजचे महाव्यवस्थापक दिलीप स्वामी, उपमहापौर निलेश भेंडे, डॉ. अनंत मराठे, ज्येष्ठ धन्वंतरी डॉ. सुरेश सावदेकर, डॉ. चंद्रशेखर कुळकर्णी, डॉ. ऋषिकेश सावदेकर, डॉ. स्मिता हंतोडकर, डॉ. जयंत पांढरीकर, माजी खासदार अनंत गुढे, मंगल वस्त्रालयाचे संचालक प्रशांत मुंधडा, श्रीकांत बोरखडे, ॲड. राजेंद्र पांडे, डॉ. ॲड. रविंद्र उल्हास मराठे, जि.बी.देशमुख, माजी उपमहापौर प्रमोद पांडे, बिल्डर निलेश ठाकरे, अनिल माधोगढीया, एमआयडीसी इंडस्ट्रीयल असोसिएशनचे विरेंद्र लड्ढा, डॉ. किशोर ुले, दिलीप दाभाडे, दिलीप कलोती, प्रा. अलखनंदा तुळजापूरकर, माजी प्राचार्या डॉ. शोभा रोकडे, डॉ. स्मिता सिकची, डॉ. सुशिल सिकची, प्राचार्य अनिल खांडेकर, प्रा. संजय मराठे, अनिता कुळकर्णी, नितीन अग्रवाल, माजी नगरसेवक संजय अग्रवाल, सुरेशकाका ढोक, नितीन जाधव, पाठक सर, प्रा. निनाद सोमण, सुरेंद्र बुरंगे, अतुल देशमुख, किशोर कलोती, ॲड. गणोरकर, डॉ.श्रीगोपाल राठी, प्रा.नरेंद्र राऊत, सोपान गोडबोले, प्रा. मोहन काटे, डॉ. गोपी भामोरे, ॲड. श्रीकांत खोरगडे, अविनाश भडांगे, दिपक अग्रवाल, प्रा. मनोज पिंपळे, रोहीत पटेल, सुधिर गाडगे, संदिप वानखडे, प्रसिध्दी मिडीया चे सुनिल देशमुख, प्रा. सावन देशमुख, डॉ. बबन बेलसरे, डॉ. विलास नांदूरकर, संजिवनी भोगावकर, प्रा. कुमार बोबडे, सुर्यकांत कोल्हे, जितेंद्र रोडे, राजूआप्पा सपाटे, अभिनंदन पेंढारी, दिपक हुंडीकर, उद्योजक अरुण वरणगावकर, डॉ. मोना चिमोटे, प्रा. किशोर शिरभाते, विक्रम झंवर, ॲड. संजय सांगाणी, प्रा. अनंत उताणे, श्रीनाथ वानखडे, जयंत कद्रे, ॲड. देशमुख, दिपक गुल्हाने, उदय चाकोते, पियुष जोशी, संजय पाखोडे, शशांक नागरे, रविंद्र लाखोडे, डॉ. उज्वला टांक, अरविंद लुंक्कड, विष्णू सोळंके, प्रा. संजय खडसे, जगदिश सायसीकमल, प्रा. यशवंत हरणे, रविंद्र उल्हे, डॉ. नितीन सेठ, महेंद्र अंबरते, गोपाल उताणे, दै. हिंदुस्थान परिवारातील जांबूवंत देशमुख, शरद गढीकर, शैलेश धुंदी, दै. हिंदुस्थानचे उपसंपादक अजय दुपारे, दै. हिंदुस्थान चे चांदूरबाजार तालुका प्रतिनिधी सागर सावळे यांचेसह शहरातील गणमान्य उपस्थित होते.





समाजकार्याची प्रेरणा मुलाकडूनच मिळाली : सुचेता बनसोड

सत्काराला उत्तर देताना सुचेता बनसोड यांनी आपल्या जीवनप्रवासातील संघर्ष आणि समाजकार्यामागील प्रेरणा भावपूर्ण शब्दांत मांडली. त्या म्हणाल्या की, त्यांचा मुलगा निखिलेश जन्मतः कर्णबधिर असल्याने त्याच्यासाठी विविध उपचारपद्धतींचा आधार घेतला. या प्रयत्नांतून त्याच्या आयुष्यात सकारात्मक बदल घडला; मात्र याच अनुभवाने समाजातील अनेक कर्णबधिर मुलांसाठी काहीतरी करण्याची जाणीव अधिक तीव्र झाली. याच सामाजिक बांधिलकीतून २००७ मध्ये एकवीरा मल्टिपर्पज फाउंडेशनची स्थापना करण्यात आली.

बनसोड दाम्पत्य खऱ्या अर्थाने शुभंकर : डॉ. मोहना कुळकर्णी

अध्यक्षीय मनोगतात डॉ. मोहना कुळकर्णी यांनी बनसोड दाम्पत्याच्या सेवाभावी कार्याचे विशेष कौतुक केले. त्या म्हणाल्या की, प्रत्येक व्यक्ती स्वतःच्या सुखासाठी परिश्रम घेत असते; मात्र स्वतःला समाजासाठी समर्पित करणाऱ्या व्यक्तींचे कार्य समाजाला दिशादर्शक ठरते. सुचेता आणि श्रीकांत बनसोड दाम्पत्याने कर्णबधिर मुलांच्या आयुष्यात सकारात्मक बदल घडविण्याचे कार्य स्वीकारले आहे. समाजातील वंचित आणि गरजू घटकांना आधार देऊन त्यांना आत्मनिर्भर बनविण्याचा त्यांचा प्रयत्न कौतुकास्पद आहे. जीवनातील अडचणींकडे तक्रारी म्हणून न पाहता समस्या म्हणून स्वीकारल्यास त्यावर उपाय शोधता येतो, हा दृष्टिकोन बनसोड दाम्पत्याने आपल्या कार्यातून प्रत्यक्ष कृतीत आणला आहे. कर्णबधिर मुलांना स्वीकारून त्यांच्या सक्षमीकरणासाठी आयुष्य समर्पित करणारे हे दाम्पत्य खऱ्या अर्थाने समाजासाठी शुभंकर असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.

सुचेता बनसोड यांनी उभारली परिवर्तनाची नवी चळवळ : ज्ञानेश्वर मुळे

प्रमुख अतिथी ज्ञानेश्वर मुळे यांनी आपल्या मनोगतातून बनसोड दाम्पत्याच्या कार्याचा गौरव केला. ते म्हणाले की, स्वातंत्र्याचा अर्थ आणि त्याचे महत्त्व प्रत्येकासाठी वेगवेगळे असले, तरी स्वातंत्र्याचे खरे भान असणारी माणसे समाजाला अधिक सक्षम करण्यासाठी कार्यरत असतात. सुचेता बनसोड यांनी कर्णबधिर मुलांच्या सक्षमीकरणासाठी उभारलेले कार्य ही अशाच सामाजिक परिवर्तनाची सुरुवात आहे. त्यांच्या कार्याची प्रभा दिवसेंदिवस अधिक तेजस्वी होत आहे. दैनिक हिंदुस्थाननेही स्वातंत्र्यपूर्व काळापासून राष्ट्रवादी ध्येयवाद आणि सामाजिक बांधिलकीची परंपरा जपत अशा कार्यकर्त्यांना समाजासमोर आणण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले आहे.हा सन्मान केवळ एका संस्थेच्या कार्याचा गौरव नसून त्यामागील मातृत्व, त्याग आणि संवेदनशीलतेचा सन्मान आहे, असे सांगत त्यांनी छत्रपती शाहू महाराजांच्या सामाजिक न्यायविषयक कार्याचे उदाहरण दिले. दुर्बल घटकांना सक्षम करण्यासाठी त्यांनी आरक्षणाची व्यवस्था निर्माण केली. समाजातील वंचित घटकांना न्याय मिळवून देण्याची हीच सामाजिक जाणीव सुचेता बनसोड यांच्या कार्यातून दिसून येते. समाजासाठी कार्य करणाऱ्या अशा व्यक्तींना समाजानेही पाठबळ देण्याची गरज असल्याचे आवाहन त्यांनी केले.

मेळघाटच्या वनसंपदेवर कोणाचा डोळा?

प्रकल्पांच्या नावाखाली जंगलांवर घाला; माजी राज्यमंत्र्यांचा एल्गार!

विदर्भ प्रजासत्ताक दि.२१अमरावती

विदर्भाचे वैभव असलेल्या मेळघाटच्या समृद्ध वनसंपदेवर आता एका समूहाची गिधाडदृष्टी पडली आहे. विकासाच्या गोंडस नावाखाली निसर्गाची लूट आणि स्थानिकांच्या रोजगाराचे मृगजळ खपवून घेतले जाणार नाही, असा आक्रमक इशारा माजी राज्यमंत्री डॉ. सुनील देशमुख यांनी दिला आहे. चिखलदरा तालुक्यातील आडनदी परिसरात प्रस्तावित १,५०० मेगावॅटच्या जलविद्युत प्रकल्पावरून त्यांनी सरकारवर जोरदार टीकास्त्र सोडले आहे.

चिखलदरा तालुक्यातील आडनदी,भांडरी आणि जामली परिसरातील सुमारे २४०.६१ हेक्टर क्षेत्रात अदानी समूहाचा १,५०० मेगावॅट क्षमतेचा 'पंप स्टोरेज' जलविद्युत प्रकल्प प्रस्तावित आहे. हा परिसर मेळघाट व्याघ्र प्रकल्पाच्या बफर क्षेत्राशी संबंधित असून, वन्यजीवांचा संचारमार्ग व दुर्मिळ जैवविविधतेसाठी अत्यंत संवेदनशील आहे. या प्रकल्पामुळे जंगलाचे तुकडीकरण आदिवासींचे होऊन नैसर्गिक जीवन उद्ध्वस्त होईल यातून ४,८०० रोजगार निर्माण होतील, हा दावा त्यांनी फेटाळून लावला आहे.



'मी स्वतः जलसंपदामंत्री म्हणून काम केले असल्याने अशा प्रकल्पांची व्याप्ती मला ठाऊक आहे. त्यामुळे हजारो कोटींची गुंतवणूक आणि प्रत्यक्ष रोजगार यांचा संबंध जोडणे म्हणजे स्थानिक आदिवासी युवकांच्या डोळ्यांत धूळफेक करण्यासारखे आहे,' असेही डॉ. देशमुख यांनी स्पष्ट केले.

संत जयसिंग महाराजांच्या पालखीचे पहिल्यांदाच कौंडण्यपूरकडे प्रस्थान

पथ्रोट ते कौंडण्यपूर पायदळ दिंडी सोहळा

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२१पथ्रोट- ग्रामदैवत संत जयसिंग महाराज यांच्या पालखी सोहळ्याचे पहिल्यांदाच पथ्रोट येथून कौंडण्यपूरकडे प्रस्थान झाले. बुधवारी (ता. १८) 'श्रीं'चा अभिषेक करून पायदळ दिंडी सोहळ्याला सुरवात करण्यात आली. यावेळी ग्रामप्रदक्षिणे दरम्यान ठिकठिकाणी पालखीचे भावपूर्ण स्वागत करण्यात आले. या सोहळ्याची सांगता २५ नोव्हेंबरला कौंडण्यपूर येथे होणार आहे. या पायदळ दिंडीमध्ये केवळ पुरुष सेवेकऱ्यांचा समावेश आहे. पालखी मार्गावर सेवेकऱ्यांसाठी चहा, नाश्ता, दुपारचे जेवण आणि रात्रीच्या मुक्कामाची व्यवस्था करण्यात आली आहे. पथ्रोट, टवलार, हरम, अचलपूर नाका, विठ्ठल मंदिर अचलपूर, त्रिवेणी नदी संगम, गुरुदेव प्रार्थना मंदिर तळेगाव मोहना, कुरळपूर्णा, शिरजगावबंड, चांदूरबाजार, बोराळा, शिराळा, देवरा, यावली शहीद, डिगरगव्हाण, शिवणगाव , शिरजगाव मोझरी, वऱ्हा आणि मार्डा याठिकाणी पालखीचे मुक्काम निश्चित करण्यात आले आहेत. २५ नोव्हेंबरला कौंडण्यपूर येथील रुक्मिणी माता मंदिराची नगरप्रदक्षिणा करून परतीचा प्रवास सुरू होईल. त्यानंतर पालखी प्रसन्न पॅलेस, पथ्रोट येथे पोहोचणार आहे. तेथे 'श्रीं'चे स्वागत व नगरप्रदक्षिणा झाल्यानंतर जयसिंग महाराज संस्थान, पथ्रोट येथे पालखी सोहळ्याची सांगता होणार आहे. या पालखी सोहळ्याचे दिंडीप्रमुख व चालक म्हणून हर्षल महाराज उके जबाबदारी सांभाळत आहेत. ग्रामदैवताच्या पालखीचा हा पहिलाच कौंडण्यपूर प्रवास असल्याने भाविकांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.



धारणीचे नगराध्यक्ष सुनील चौथमल यांचा गौरव

राष्ट्रीय कलाल समाज महाकुंभात सन्मान

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२१अमरावती

अखिल भारतीय कलाल समाज समिती आणि अखिल भारतीय भारवर्षीय हैहय कलचुरी महासभा यांच्या संयुक्त विद्यमाने अमरावती येथे १३ ते १५ नोव्हेंबरदरम्यान आयोजित तीन दिवसीय राष्ट्रीय कलाल समाज महाकुंभ उत्साहात पार पडला. या महाकुंभात धारणीचे नगराध्यक्ष सुनील चौथमल यांचा विशेष सन्मान करण्यात आला. उद्घाटन पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते झाले. यावेळी समाजाच्या राष्ट्रीय अध्यक्षांसह माजी खासदार नवनीत राणा यांच्या हस्ते नगराध्यक्ष सुनील चौथमल यांचा गौरव करण्यात आला. तीन दिवस चाललेल्या या महाकुंभात समाजाच्या विकासासाठी विविध उपक्रम राबविण्यात आले. पहिल्या दिवशी शेतकरी व कृषी मार्गदर्शन मेळाव्यात आधुनिक शेती, कृषी तंत्रज्ञान आणि शेतीपूरक व्यवसायांची माहिती देण्यात आली. दुसऱ्या दिवशी रोजगार व उद्योग मेळाव्याच्या माध्यमातून युवकांना व्यवसाय आणि रोजगाराच्या संधींबाबत मार्गदर्शन करण्यात आले. याशिवाय वधू-वर परिचय संमेलन आणि १३ ते १५ नोव्हेंबरदरम्यान राज्यस्तरीय क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. १५ नोव्हेंबरला श्री संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन येथे अखिल भारतीय महाअधिवेशनाने महाकुंभाची सांगता झाली.



जिल्ह्याभरातील ग्रामपंचायतीचे आरक्षण जाहीर;आता लक्ष पुढील प्रकियेकडे

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२१दर्यापूर

जिल्ह्यातील नऊ तालुक्यांतील ग्रामपंचायतींच्या सरपंचपदासाठी सन २०२६ ते २०३० या कालावधीसाठीचे आरक्षण शुक्रवारी जाहीर करण्यात आले. एकूण नऊ तालुक्यांमध्ये २९८ ग्रामपंचायतींच्या सरपंचपदासाठी विविध वर्गवारीमध्ये आरक्षण काढण्यात आले. या आरक्षणावरून ग्रामीण मतदारांमध्ये संमिश्र प्रतिक्रिया उमटल्या आहेत.

तालुक्यातील ७४ ग्रामपंचायतींचे आरक्षण जाहीर झाले. अनुसूचित जाती आरक्षणातील पेठ इतबापूर, शिवर बु, तेलखेडा, कळमगव्हाण, नाचोना, सांगळूद, लासूर, माटरगाव, बेबळा बु, या ग्रामपंचायती महिला, तर उर्वरीत कोळंबी, कान्होली, थिलोरी, टाकळी, करतखेडा, शिंगणवाडी, चंद्रपूर, गौरखेडा अशा आहेत. अनुसूचित जमातीसाठी घडा, एरंडगाव (महिला) टोंगलाबाद, गायवाडी येथे आरक्षण जाहीर झाले. नामाप्रसाठी जाहीर १६ पैकी वडनेर गंगाई, उमरी इतबारपूर, वडाळगव्हाण, सासन रामपूर, येवदा, दारापूर, शिंगणापूर, नालवाडा येथे महिला आरक्षण आहे.

उर्वरित माहुली धांडे, अहूळा बाजार, सुकळी, वडुरा, भामोद, आमला, नांदरुण, शिरजदा येथे आरक्षण झाले आहे.सर्वसाधारण ३७ पैकी सामदा, इटकी, नरदोडा, उपराई, वरुड बु, धामोडी, घोडचंडी, चांडोळा, रुस्तमपूर, गोळेगाव, हिंगणी मिर्झापूर, मार्कडा, खैरी, नायगाव, महिमापूर, कळाशी, बेलोरा, सांगवा बु, जैनपूर येथे महिला राखीव, तर खल्लार, आराळा, बोराळा, चंडीकापूर, नांदेड बु, सासन बु, पनोरा, म्हैसपूर मोचर्डा, नरशिंगपूर, रामतीर्थ, डोंगरगाव, लेहगाव, रामगाव, उमरी ममदाबाद, पिपलोद, लोतवाडा, जसापूर, पिंपळखुटा या ग्रामपंचायती खुल्या आहेत.



सोडतीसाठी प्राधिकृत अधिकारी तहसीलदार डॉ. रवींद्रकुमार कानडजे होते, आरक्षण जाहीर होताच दर्यापूर तालुक्यातील राजकीय हालचालींना वेग आला आहेत.

अंजनगाव सुर्जी तालुक्यातील ४९ सरपंचपदांचा कौल

अंजनगाव सुर्जी तालुक्यात अनुसूचित जातीसाठी हिरापूर, कोतेगाव, चिंचोली शिंगणे, चनोजा, एकलारा यांच्यासह पोही, मलकापूर बु., शेलगाव, दहीगाव खुर्द, पिंपळगव्हाण, खिराळा ग्रामपंचायती महिला राखीव आहेत. हंतोडा येथे अनुसूचित जमाती महिला सरपंच असतील. नामाप्रसाठी साखरी, काळगव्हाण, कारला, टाकरखेडा मोरे, सातेगाव, चिंचोली बु. तसेच अडगाव खाडे, खासपूर, चौसाळा, कमालपूर तरोडा, कोकर्डा, खानमपूर पांढरी हे महिला राखीव आहेत. सर्वसाधारण खिरगव्हाण, लखाड, हुसेनपूर खोडगाव, जवडर्डी, चिंचोली खुर्द, निमखेड बाजार, विहीगाव बु., धनेगाव, कापूसतळणी, कुंभारगाव बु., तुरखेड, सोनगावसह घोडसगाव, लाखनवाडी, जवळा बु., निंभारी, वरुड खु., हिंगणी, मुन्हा बु., हसनापूर पार्टी, बोराळा, भंडारज, कसवेगव्हाण, हयापूर, गावंडगाव बु. या महिला राखीव ग्रामपंचायती राहतील.-

चांदूरबाजार ग्रामपंचायतींच्या सरपंच पदाचे आरक्षण जाहीर; चिमुकलीने काढली ईश्वरचिठ्ठी

तालुक्यातील एकूण ६६ ग्रामपंचायतींपैकी ४५ ग्रामपंचायतींच्या सरपंच पदाचे आरक्षण आज जाहीर करण्यात आले. यामध्ये नामाप्र, नामाप्र महिला, सर्वसाधारण आणि सर्वसाधारण महिला या प्रवर्गासाठी आरक्षण निश्चित करण्यात आले. यापूर्वी निश्चित करण्यात आलेले अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रक्रगाचे आरक्षण कायम ठेवण्यात आले असून, आजच्या प्रक्रियेत उर्वरित प्रवर्गांचे आरक्षण काढण्यात आले. नामाप्र प्रवर्गासाठी थुगाव पिंपरी, खराळा, कृष्णापूर, शिरसगाव कसबा, जसापूर व कोणवर्धा या ग्रामपंचायतींचा समावेश आहे. नामाप्र महिला प्रवर्गासाठी वडूरा, काजळी, आखडवाडा, ब्राह्मणवाडा पाठक, सरफाबाद व धानोरा या ग्रामपंचायतींचे आरक्षण निश्चित झाले. सर्वसाधारण प्रवर्गासाठी पिंपरी पूर्णा,शिरसगाव बंड, नानोरी, टाकरखेडा पूर्णा, विसरोळी, बोदळ, बेलज, विरूळ पूर्णा, राजनापूर्णा, बोराळा जेयनपूर, सोनोरी, हैदतपूर, लाखनवाडी, खरवाडी व घाटलाडकी या ग्रामपंचायतींचा समावेश आहे. सर्वसाधारण महिला प्रवर्गासाठी जालनापूर, गोविंदपूर, बोरगाव मोहना, रसूलापूर, कुरूळ पूर्णा, तुळजापूर गढी, दहिगाव पूर्णा, बोलोरा, कारंजा बहिरम, हिरूळ पूर्णा, तळवेल निमखेड, वणी, तोंडगाव, कुरणखेड, रतनपुर व मासोद या ग्रामपंचायतींचे आरक्षण निश्चित करण्यात आले. ही आरक्षण प्रक्रिया उपविभागीय अधिकारी सुनील टाकळे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. यावेळी तहसीलदार योगेश गाडे, तहसीलदार मनीष यंबरवार व सचिन कंदमवार यांनी प्रक्रियेत सहभाग घेतला. विशेष म्हणजे, चिमुकल्या शुभश्री हिवसे हिच्या हस्ते ईश्वरचिठ्ठी काढून आरक्षण निश्चित करण्यात आले.

मागील वर्षी हजारो वाचकांनी दिलेल्या प्रतिसादाबद्दल वाचकांचे मनःपूर्वक आभार!

विशेषलेख, कविता, पर्यटन, साहित्यिक, सर्व काही विदर्भ प्रजासत्ताक च्या दिवाळी अंकात



दैनिक
विदर्भ प्रजासत्ताक
दिवाळी विशेषांक
२०२६

सर्व वाचकांना दीपावली च्या हार्दिक हार्दिक शुभेच्छा !

दिवाळी अंक सर्वत्र उपलब्ध